## आर.सी.सी. बिल्डींग बांधतांना घ्यावयाची काळजी

१) इमारतीचे डिझाईन हे B.I.S. मानकाप्रमाणे असणे आवश्यक आहे.:-
I.S. 456-2000 & I.S. 1893-2001
२) इमारतीचा पाया कठीण जमिनीवर ठेवणे आवश्यक आहे.
३) मऊ जमिनीवर पायाचे बांधकाम करण्यापूर्वी खडी वापरुन धुमसणे आवश्यक आहे.
४) इमारतीच्या जमीन पातळी / जोत्याच्या लेवलला टाय बीम असणे आवश्यक आहे.
५) इमारतीचा आकार हा भूमितीय (Geometric) व समरुप (Symmetric) असणे आवश्यक आहे.
६) इमारतीचे बांधकाम नियोजित करताना (Cantilever) तसेच मोठे पोर्च टाळावेत.
७) कमीत कमी काँक्रीटची गुणवत्ता M20 grade
[Proportion by weight-cement: sand: aggregate- 1:1 ½ :3 असावी.
८) इमारतीमधील खांबाची जाडी 200mm (8") पेक्षा कमी असू नये.
९) इमारतीमधील खिडक्या व दरवाजे शक्यतो कोपऱ्यात नसावेत.
१०) इमारतीचे सर्व बांधकाम हे आर्किटेक्ट व स्ट्रक्चरल डिझायनर यांच्या नकाशाप्रमाणे आहे याची खात्री करावी.
११) जिन्याची सुयोग्य रचना अत्यंत गरजेची आहे.
१२) इमारतीत वापरले जाणारे स्टील हे प्रमाणित दर्जाचे
(उदा. Tor 40 / grade Fe-415 / 500) स्टील असावेत.
१३) इमारत भूकंप प्रतिबंधक करताना कोणताही अवास्तव खर्च येत नाही.
१४) भूकंप प्रतिरोधक घराचे बांधकाम करण्याचा मुख्य उद्देश वित्त हानी व जीवित हानी टाळणे हा असतो.



## सर्वात महत्वाचे :

बांधकाम व्यावसायिकाकडून फ्लॅट घेण्यापूर्वी अथवा स्वतंत्र बंगला बांधण्यापूर्वी (I.S. 456-2000 d I.S.1893-2001) मानकाप्रमाणे बांधकाम केलेले आहे किंवा करणार आहे याचे प्रमाणपत्र घ्या.

## लोड बेअरिंग घर बांधताना घ्यावयाची काळजी

१) हेडर घालणे-दगडी बांधकाम करताना जेवढ्या रुंदीचे बांधकाम आहे. तेवढ्या रुंदीचे एक अखंड दगड प्रत्येक तीन फुटाला प्रत्येक थरास घालणे आवश्यक आहे.
२) दगडी बांधकाम करताना गोठ्याचा वापर टाळावा.
३) दगडी बांधकाम करताना कोपरे विटकामात न बांधता कमीत कमी दोन फूट रुंदीचे दगडाचे असावेत.
४) बांधकामावर जोत्याच्या लेवलला आर.सी.सी.1:2:4 बँड टाकणे आवश्यक आहे.
५) प्रत्येक खोलीस छताच्या पातळीस आर.सी.सी. बँड असणे आवश्यक आहे.
६) प्रत्येक खोलीच्या चारही कोपऱ्याचे मजबूतीकरण करण्यासाठी सलोह काँक्रीट वापरणे व त्याची प्लीन्थ, लिंटल व रुफ बँडमध्ये अडक करणे आवश्यक आहे.
७) प्रत्येक खोलीत दारे व खिडक्यांच्या वरती आर. सी. सी. लिंटल टाकणे आवश्यक आहे.
८) दरवाजे व खिडक्या छोट्या आकाराच्या असाव्यात व त्या कोपऱ्यात नसाव्यात.
९) घराचे सर्व दरवाजे व खिडक्यांचा वरचा भाग समपातळीत असावा.
१०) वरील सर्व गोष्टींचा अंतर्भाव केला तर भूकंप प्रतिबंधक घर बांधताना कोणताही अवास्तव खर्च येत नाही.